# मिरा भाईंदर महानगरपालिका

## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

दूरध्वनी: 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल: mbmcho@gmail.com वेबसाईट: www. mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मुख्य कार्यालय


जा. क्र. मिभा / मनपा /आ.प्र/३६६/२०२३-२४ दिनांक: ०७/०२/२०२४

## ।। परिपत्रक ।।

प्रतिवर्षाप्रमाणे सोमवार **दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती** साजरी करण्यात येणार आहे. त्यानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा माळा येथे सकाळी १०.०० वाजता **मा.श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से), आयुक्त तथा प्रशासक** यांच्या शुभहस्ते व मा.अति.आयुक्त-१, मा.अति.आयुक्त-२, उपायुक्त (सर्व), शहर अभियंता, नगरसचिव, अधिकारी/कर्मचारी वर्ग व पत्रकार यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. त्यानिमित्त सकाळी ०९.०० वाजता काशिमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पुतळयास तसेच सकाळी ०९.३० वाजता एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) समोर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयांस पुष्पहार अर्पण करणे. तद्नंतर सकाळी ०९.४५ वाजता महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे समोरील प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळयास व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्धाकृती पुतळयांस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

तसेच महानगरपालिका मुख्य कार्यालय दुसरा मजला येथे सकाळी ठिक १०.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस **मा.श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से), आयुक्त तथा प्रशासक** यांचे शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यांत येणार आहे. तसेच शासन निर्णयानुसार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून "जय जय महाराष्ट्र माझा, गरजा महाराष्ट्र माझा" या राज्यगीताचे वादन करण्यात येईल.

तरी सदर कार्यक्रमास आपण आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांसह उपस्थित रहावे. जे अधिकारी/कर्मचारी उपस्थित रहाणार नाहीत, त्यांचेवर नियमानुसार कारवाई केली जाईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(मारुती गायकवाड)
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

-----------------------

-----------------------